नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज


संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे | Year - 3rd | अंक - २९५ | Issue - 295 | वार मंगळवार दि. १७ मार्च २०२६ | Blow- Tuesday Date 17 March 2026 | ई-पेपर - https://epaper.yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# 'महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य विधेयक' विधानसभेत मंजूर

## मुख्यमंत्र्यांनी दिली माहिती; धर्मस्वातंत्र्य विधेयक सर्व धर्मांना समानरितीने लागू होणार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : धर्मांतराच्या मुद्द्यावरून राज्यात वारंवार उद्भवणारी कायदा आणि सुव्यवस्थेची स्थिती आणि फसवणुकीतून होणारे गैरप्रकार रोखण्यासाठी 'महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य विधेयक' हे महत्त्वपूर्ण कवच ठरणार आहे. हे विधेयक कोणत्याही एका विशिष्ट धर्माच्या विरोधात नसून, ते सर्व धर्मांना समान रीतीने लागू असेल. आमिष, फसवणूक आणि बळजबरीने होणाऱ्या धर्मांतरापासून पासून रक्षण करणे, हाच या कायद्याचा मुख्य उद्देश आहे, अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी सभागृहात या विधेयकाचे जोरदार समर्थन केले.

'महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य विधेयक, २०२६' विधेयकाच्या माध्यमातून धर्मांतराच्या नावाखाली होणाऱ्या बेकायदेशीर कृत्यांना चाप बसणार असून, विरोधकांनी पसरवलेल्या अफवांना बाजूला सारून याकडे बघावे, असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले. ते म्हणाले, धर्मांतराच्या वादातून दोन गट समोरासमोर येण्याचे प्रकार टाळण्यासाठी सध्याच्या कायद्यात पुरेशी स्पष्टता नाही. त्यामुळे प्रभावी (इफेक्टिव्ह) कारवाई करण्यासाठी ठोस तरतुदींची आवश्यकता होती. महाराष्ट्र हे असे विधेयक आणणारे पहिले राज्य नाही, तर १९६८ पासून आतापर्यंत देशातील १२ राज्यांनी असे कायदे केले आहेत. आम्ही केवळ नागरिकांच्या संरक्षणासाठी हे पाऊल उचलले आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

लग्नासाठीचे बेकायदेशीर धर्मांतर ठरणार अवैध

मुख्यमंत्री म्हणाले, विधेयकातील तरतुदींनुसार, केवळ बेकायदेशीर धर्मांतराच्या उद्देशाने केलेला कोणताही विवाह न्यायालय आता 'शून्यवत' (अवैध) आणि निरर्थक घोषित करू शकेल. तसेच, अशा विवाहातून जन्माला आलेल्या बालकाच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी, त्या बालकाचा धर्म त्याच्या आईचा धर्म मानला जाईल. शिवाय, पालकांच्या मालमत्तेतील उत्तराधिकाराचा हक्कही त्या बालकासाठी कायम ठेवण्यात आला आहे. स्वेच्छेने धर्मांतर करू इच्छिणाऱ्या व्यक्तीला आता ६० दिवस आधी पूर्वकल्पना देणारी नोटीस देणे अनिवार्य असेल. हे धर्मांतर कोणत्याही दडपणाशिवाय किंवा आमिषाशिवाय होत असल्याची खात्री सक्षम प्राधिकरणाकडून केली जाईल. जर कुणी बळजबरीने किंवा लबाडीने धर्मांतर घडवून आणले, तर संबंधित व्यक्तीसह संस्थाही शिक्षेस पात्र ठरतील, असा इशारा मुख्यमंत्र्यांनी दिला.

हा कायदा कोणत्याही धर्माच्या विरोधात नाही, तर कायद्याच्या 'लेटर आणि स्पिरीट'मध्ये नागरिकांच्या मूलभूत अधिकारांचे रक्षण करण्यासाठी मांडला आहे. सभागृहाने यास मान्यता देऊन सामाजिक सलोखा राखण्यास मदत करावी, असे आवाहन देखील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

# बायपास शस्त्रक्रीयेसाठी एक रुपयाही खर्च येत नाही! आरोग्यमंत्र्यांची माहिती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : राज्यातील गरजू रुग्णांना बायपास शस्त्रक्रियेसाठी स्वतःच्या खिशातून एक रुपयाही खर्च करण्याची गरज नाही. 'आयुष्मान भारत' आणि 'महात्मा फुले जनआरोग्य' या योजनांच्या एकत्रित अंमलबजावणीमुळे ही शस्त्रक्रिया पूर्णपणे मोफत केली जाते. जर एखाद्या रुग्णालयाने या उपचारांसाठी पैसे मागितले, तर त्यांच्यावर तत्काळ कठोर कारवाई केली जाईल, अशी ग्वाही आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी सोमवारी विधानसभेत दिली.

**रुग्णालयांनी पैसे मागितल्यास त्वरित कारवाई करणार**

विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासादरम्यान सरकारी आरोग्य योजनांच्या सद्यस्थितीवर जोरदार चर्चा झाली. यावेळी भाजप आमदार बबनराव लोणीकर यांनी आरोग्य योजनांच्या अंमलबजावणीतील त्रुटींकडे लक्ष वेधले. त्यांनी विठ्ठल कदम या शेतकऱ्याचे उदाहरण सभागृहासमोर मांडले. बायपास शस्त्रक्रियेसाठी साधारण ११ लाख रुपये खर्च येतो. केंद्र आणि राज्य सरकारच्या योजनांतून ६ लाख रुपयांपर्यंत मदत मिळण्याची तरतूद असताना, संबंधित रुग्णालयाने या शेतकऱ्याला केवळ १ लाख रुपयेच मदत मिळेल असे सांगितले. परिणामी, पैसे नसल्यामुळे या शेतकऱ्याची शस्त्रक्रिया गेल्या दोन महिन्यांपासून रखडली आहे. ६ लाख रुपये देण्याची तरतूद कागदावर असताना रुग्णाला प्रत्यक्षात १ लाखच का दिले जातात? असा सवाल लोणीकर यांनी उपस्थित केला.

लोणीकर यांच्या प्रश्नाला उत्तर देताना आरोग्यमंत्री आबिटकर म्हणाले की, पूर्वी या योजनांमध्ये काही मर्यादा होत्या, मात्र आता केंद्राची आयुष्मान भारत योजना राज्याच्या महात्मा फुले जनआरोग्य योजनेशी जोडण्यात आली आहे. यामुळे उपचारांसाठी मिळणाऱ्या निधीची मर्यादा वाढवण्यात आली असून बायपाससारख्या मोठ्या शस्त्रक्रिया आता पूर्णतः मोफत होणे बंधनकारक आहे. रुग्णालयांनी कोणत्याही तांत्रिक कारणास्तव रुग्णाला परतावा देण्यास नकार दिल्यास किंवा अतिरिक्त पैशांची मागणी केल्यास त्याबाबत तक्रार करण्याचे आवाहन त्यांनी केले.

प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालये आणि उपजिल्हा रुग्णालयांच्या स्तरावर या योजनांची माहिती तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी लोकप्रतिनिधींनी सहकार्य करावे, असे आवाहनही मंत्र्यांनी यावेळी केले. बायपाससाठी एकाही पैशाची गरज नाही. ज्या रुग्णालयांनी पैसे मागितले आहेत, त्यांची माहिती आम्हाला द्या, आम्ही त्यांच्यावर त्वरित कारवाई करू, असेही ते म्हणाले.

# सेवानिवृत्त एसटी कर्मचाऱ्यांना पत्नीसह वर्षभर मोफत प्रवास करता येणार; मंत्री प्रताप सरनाईक यांची घोषणा





मुंबई : एसटी कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर सकारात्मक तोडगा काढण्यासाठी राज्याचे परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी विधानभवन येथे महत्त्वपूर्ण बैठक घेतली. या बैठकीत कर्मचारी संघटनांनी मांडलेल्या तक्रारी व मागण्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. त्या टप्प्याटप्प्याने मार्गी लावण्यासाठी प्रशासनाला आवश्यक निर्देश देण्यात आले. तसेच एस.टी.च्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना यापुढे पत्नीसह वर्षभर मोफत प्रवासाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती मंत्री सरनाईक यांनी दिली.

एसटी महामंडळात कार्यरत असलेल्या सेवा शक्ती संघर्ष एसटी कर्मचारी संघाने चालक-वाहकांवरील कारवाई, आगार व्यवस्थापनातील अडचणी तसेच काही प्रशासकीय प्रक्रियांमुळे निर्माण होणाऱ्या समस्यांकडे मंत्री महोदयांचे लक्ष वेधले होते. या पार्श्वभूमीवर संघाचे अध्यक्ष आमदार सदाभाऊ खोत तसेच संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसोबत मंत्री सरनाईक यांनी सकारात्मक चर्चा केली. कर्मचाऱ्यांना न्याय मिळावा हीच महामंडळाची भूमिका असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. विधानभवनातील दालनात झालेल्या या बैठकीत एस.टी. महामंडळाचे कामकाज अधिक पारदर्शक व प्रवासी तसेच कर्मचारी हिताचे करण्यावर विशेष भर देण्यात आला.

मंत्री सरनाईक यांनी एकाच ठिकाणी तीन वर्षांपेक्षा अधिक काळ सेवा बजावणाऱ्या पर्यवेक्षक व अधिकाऱ्यांची इतर ठिकाणी बदली करण्याचे निर्देश एस.टी. प्रशासनाला दिले. या संदर्भात कर्मचारी संघटनांच्या भावना तीव्र असून, या प्रक्रियेची अंमलबजावणी तातडीने करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

सामान्य प्रवाशांना उत्तम सेवा देणे हेच एस.टी.चे तसेच सर्व कर्मचाऱ्यांचे अंतिम उद्दिष्ट आहे. त्यामुळे काम करताना चालक-वाहकांना भेडसावणाऱ्या दैनंदिन अडचणी, आगार स्तरावरील निर्णयप्रक्रिया तसेच शिस्तभंग कारवाईच्या बाबतीत न्याय्य व पारदर्शक पद्धतीने काम करण्याचे निर्देश मंत्री सरनाईक यांनी यावेळी दिले.

मंत्री सरनाईक म्हणाले की, कर्मचारी संघटनांशी नियमित संवाद साधून त्यांच्या समस्या सोडविण्याबाबत एस.टी. प्रशासन सकारात्मक आहे. कर्मचाऱ्यांच्या अडचणी समजून घेऊन त्यावर शक्य तितक्या लवकर कार्यवाही करण्याची महामंडळाची भूमिका आहे, जेणेकरून सामान्य प्रवाशांना अधिक चांगली सेवा देणे शक्य होईल. त्यामुळे एस.टी. व्यवस्थापनाने कर्मचाऱ्यांच्या मागण्यांचा विचार करून सामोपचाराने तोडगा काढावा, असे निर्देश त्यांनी दिले. या बैठकीस एस.टी. महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर तसेच सर्व खातेप्रमुख उपस्थित होते.

# युद्धपिपासू ट्रम्प यांची कोंडी, होर्मुझमध्ये संयुक्त नौदल गस्तीचा प्रस्ताव ऑस्ट्रेलिया-जपानने धुडकावला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : सतत युद्धाची खुमखुमी असलेले अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची कोंडी झाल्याचं दिसतंय. एकीकडे, युद्ध दोन चार दिवसात संपवू अशी भाषा करत असताना युद्ध लांबलं आहे. तर दुसरीकडे आता ऑस्ट्रेलिया आणि जपानने ट्रम्प यांचा संयुक्त गस्तीचा प्रस्ताव धुडकावल्याचं दिसून आलं. हॉर्मुझच्या सामुद्रधुनीतील तेल वाहतुकीच्या सुरक्षेवरून आंतरराष्ट्रीय तणाव वाढला आहे.

पश्चिम आशियातील तणावाच्या पार्श्वभूमीवर जागतिक तेल पुरवठ्यावर परिणाम होऊ नये म्हणून अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी काही देशांना संयुक्त नौदल गस्त घालण्याचा प्रस्ताव दिला होता. विशेषतः होर्मुज सामुद्रधुनीत तेल टँकर्सच्या सुरक्षेसाठी संयुक्त पेट्रोलिंग करण्याचा हा प्रस्ताव होता.

मात्र, या प्रस्तावाला ऑस्ट्रेलियाने स्पष्ट नकार दिला. त्यानंतर जपाननेही अमेरिकेच्या प्रस्तावाला नकार देत स्वतःचा स्वतंत्र पर्याय पाहत असल्याचं स्पष्ट केलं.

त्यामुळे ट्रम्प यांची मोठी कोंडी झाल्याचं चित्र दिसत आहे. जगातील तेल वाहतुकीचा मोठा भाग होर्मुझ सामुद्रधुनीतून जात असल्यामुळे या मार्गाची सुरक्षा अत्यंत महत्त्वाची मानली जाते. तेल ग्राहक देशांनी मिळून तेल टँकर्सच्या सुरक्षेसाठी संयुक्त नौदल गस्त घालावी, असा ट्रम्प यांचा प्रस्ताव होता. मात्र ऑस्ट्रेलियानंतर जपाननेही हा प्रस्ताव नाकारला. जपानच्या पंतप्रधान सानेई ताकायची यांनी स्पष्ट केलं की, होर्मुझ सामुद्रधुनीत जहाजांच्या सुरक्षेसाठी जपान नौदल पाठवण्याचा सध्या कोणताही विचार करत नाही.

## मंगळुरुकडे पुढील प्रवास; फुजैराहहून सुखरूप रवाना

# होर्मुझमधून आलेलं भारताचं 'शिवालिक' जहाज गुजरातच्या मुंद्रा बंदरात; भारताला मोठा दिलासा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**





मुंबई : इराण युद्धामुळे देशात निर्माण झालेल्या एलपीजी टंचाईच्या संकटावर आता मार्ग निघण्याची शक्यता आहे. युद्धजन्य परिस्थितीतही होर्मुझ सामुद्रधुनी पार करून 'शिवालिक' जहाज गुजरातच्या मुंद्रा बंदरात दाखल झालं आहे. त्यामध्ये ४७ हजार मेट्रिक टन एलपीजीचा साठा असून त्यामुळे देशांतर्गत इंधन पुरवठ्यासाठी दिलासा मिळणार आहे.

युद्धजन्य परिस्थिती असतानाही होर्मुज सामुद्रधुनी पार करून भारतात पोहोचलेले शिवालिक हे पहिले भारतीय जहाज असल्याची माहिती समोर आली आहे. या जहाजात सुमारे ४७ हजार मेट्रिक टन एलपीजी गॅस असून त्यापैकी २० हजार मेट्रिक टन एलपीजी मुंद्रा बंदरात उतरवण्यात येणार आहे.

मुंद्रा बंदरात एलपीजी उतरवल्यानंतर 'शिवालिक' जहाज पुढे मंगळुरु बंदराकडे रवाना होणार आहे, जिथे उर्वरित एलपीजी उतरवण्यात येणार आहे. दरम्यान 'नंदा देवी' हे दुसरे जहाजही होर्मुझ सामुद्रधुनी पार करून भारताच्या दिशेने रवाना झाले असून तेदेखील भारतात दाखल होत आहे. केंद्र सरकारच्या माहितीनुसार, भारताचा झेंडा असलेले 'जग लाडकी' हे तेलवाहू जहाज यूएईमधील फुजैराह येथून सुखरूप भारताकडे रवाना झाले आहे. फुजैराह या तेल केंद्रावर शनिवारी हल्ला झाला असताना हे जहाज सुमारे ८० हजार ८०० टन कच्चे तेल घेऊन रविवारी सकाळी साडेदहा वाजता भारताच्या दिशेने निघाले. पश्चिम आशियातील संघर्षग्रस्त भागातून सुरक्षित परतणारे हे चौथे भारतीय जहाज असल्याचं सांगितलं जात आहे. दरम्यान, आखातात सुरू असलेल्या युद्धाचा भारतीय कामगारांवरही मोठा परिणाम झाला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सौदी अरेबिया आणि यूएईमध्ये सुमारे १५ हजार भारतीय कामगारांवर बेरोजगारीची वेळ आली आहे. पुढील महिन्यापासून काम उपलब्ध नसल्याची माहिती समोर येत आहे. यामुळे अनेक कामगारांना भारताकडे परतण्याशिवाय पर्याय नसल्याचं दिसत आहे. मात्र विमान तिकिटांचे दर जास्त असल्यामुळे कामगार आणि त्यांच्या कुटुंबीयांमध्ये चिंता वाढली आहे.

दरम्यान, दुबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर झालेल्या ड्रोन हल्ल्यानंतर बंद ठेवण्यात आलेली उड्डाणे आता हळूहळू पुन्हा सुरू होत आहेत. या विमानतळावर झालेल्या हल्ल्यानंतर काही काळ उड्डाणे थांबवण्यात आली होती. सध्या विमानतळ हळूहळू पूर्वपदावर येत असला तरी अनेक भारतीय अजूनही परतीच्या प्रतीक्षेत आहेत. ड्रोन आणि क्षेपणास्त्र हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर दुबई विमानतळावर विमानांना सतत फेरफटका मारावा लागत असून याचा पर्यटन उद्योगावरही परिणाम होत आहे. सध्या एअर इंडिया आणि इंडिगोची रोज एकच उड्डाण सेवा सुरू ठेवण्यात आली आहे.

# उन्हाळ्याच्या सुट्टीनिमित्त पुण्यातून धावणार ३३४ उन्हाळी विशेष ट्रेन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : परीक्षा संपली की वेध लागतात ते सुट्टीचे, बाहेरगावी फिरायला जायचे, त्यामुळे उन्हाळ्यात रेल्वेवर प्रवाशांचा बोजा मोठ्या प्रमाणात वाढतो, हाच बोजा कमी करण्यासाठी आणि प्रवाश्यांचा प्रवास सुखकर करण्यासाठी पुणे रेल्वे विभागाने एक आनंदाची बातमी प्रवाशांना दिली आहे.

या विशेष गाड्यांमध्ये पुणे ते दानापूर मार्गावरील दैनिक विशेष गाडीच्या सर्वाधिक २१२ फेऱ्यांचा समावेश आहे. गाडी क्रमांक ०१४४९ ही विशेष गाडी १ एप्रिल ते १५ जुलै दरम्यान दररोज पुणे येथून सुटणार आहे. तर गाडी क्रमांक ०१४५० ही गाडी ३ एप्रिल ते १७ जुलै या कालावधीत दररोज दानापूर येथून पुण्याकडे धावणार आहे.

याशिवाय पुणे ते नागपूर दरम्यान साप्ताहिक सुपरफास्ट विशेष गाड्यांचेही नियोजन करण्यात आले आहे. या मार्गावर एकूण ५३ फेऱ्या होणार आहेत. गाडी क्रमांक ०१४६९ ही गाडी २१ एप्रिल ते १४ जुलै दरम्यान प्रत्येक मंगळवारी पुणे येथून सुटेल, तर गाडी क्रमांक ०१४७० ही गाडी २२ एप्रिल ते १५ जुलै दरम्यान दर बुधवारी नागपूर येथून धावणार आहे. त्याचबरोबर पुणे ते नागपूर मार्गावर आणखी एका विशेष गाडीचीही व्यवस्था करण्यात आली आहे. गाडी क्रमांक ०१४५७ ही १५ एप्रिल ते १५ जुलै दरम्यान दर बुधवारी पुणे येथून सुटणार असून गाडी क्रमांक ०१४५८ ही १६ एप्रिल ते १६ जुलै दरम्यान दर गुरुवारी नागपूरहून धावणार आहे. या गाडीच्या एकूण २८ फेऱ्या नियोजित करण्यात आल्या आहेत.

पुणे ते गाझीपूर सिटी दरम्यान द्विसाप्ताहिक विशेष गाडीही चालवली जाणार आहे. या मार्गावर एकूण आठ फेऱ्या असतील. गाडी क्रमांक ०१४३१ ही गाडी १७ ते २८ एप्रिल दरम्यान मंगळवार आणि शुक्रवार या दिवशी पुणे येथून सुटेल, तर गाडी क्रमांक ०१४३२ ही गाडी १९ ते ३० एप्रिल दरम्यान रविवार आणि गुरुवारी गाझीपूर सिटी येथून धावणार आहे. उन्हाळी सुट्ट्यांमध्ये उत्तर भारताकडे जाणाऱ्या प्रवाशांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत असते. त्यामुळे या अतिरिक्त गाड्यांमुळे प्रवाशांना आरक्षण मिळणे सोपे होईल तसेच रेल्वेतील गर्दी कमी करण्यास मदत होईल, अशी अपेक्षा रेल्वे प्रशासनाने व्यक्त केली आहे.

## संपादकीय....

### धर्मस्वातंत्र्य विधेयक

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानसभेत धर्मांतर विरोधी विधेयक म्हणजेच धर्मस्वातंत्र्य विधेयक सादर केलं. यावेळी त्यांनी कायद्यातील अनेक तांत्रिक मुद्द्यांवर भाष्य केलं. कुठला धर्म अवलंब करायचे आहे त्याचे अधिकार हे आपल्या संविधानाने आपल्याला दिलेले आहेत. पण हे करत असताना सर्वोच्च न्यायालयाने एक गोष्ट सांगितली आहे की, प्रत्येकाला आपल्या धर्माचा अवलंब करण्याचा अधिकार असला तरी हा अधिकार काही रिस्ट्रीक्शनला अनुलक्षून देण्यात आलेला आहे. जोरजबरदस्ती करुन, आमिष देवून किंवा धमकी देवून धर्मांतर केलं जावू नये, असा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अनुषंगाने केंद्र सरकारच्या स्तरावर पूर्वी या संदर्भात कायदा तयार करावा असा विषय आला होता. त्यानंतर त्या काळात केंद्र सरकारने सांगितलं की हे राज्याच्या अख्यत्यारित हा विषय होतो. त्यामुळे राज्यांना हा निर्णय घेतला पाहिजे. वेगवेगळ्या राज्यांनी १९६८ पासून याबाबत निर्णय घेतले आहेत. त्यामुळे हा कायदा आज होतोय असं नाहीय, अस मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केलं. बळजबरी, फसवणूक इत्यादीद्वारे बेकायदेशीर धर्मांतरापासून संरक्षण करण्याकरता हे विधेयक आहे. त्यामुळे कुणी धर्मांतर करु नये याकरता हे विधेयक नाही. तर फसवणूक, बळजबरी किंवा तत्सम बाबींकरता आणि त्या माध्यमतून होणारं धर्मांतर यापासून नागरिकांचं संरक्षण झालं पाहिजे याकरता हे विधेयक आणलं आहे. धर्मस्वातंत्र्याच्या हक्काचं रक्षण करण्यासाठी आणि बेकायदेशीरपणे एका धर्मातून दुसऱ्या धर्मात नेण्यासंदर्भात हे प्रतिबंधित करतं, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले. ज्यामध्ये आमिष असेल, जबरदस्ती असेल, फसवणूक असेल, बळजबरी, लबाडी किंवा अल्पवयीन धर्मांतर असेल, गैरवाजवी प्रभाव असेल अशा धर्मांतराला बेकायदेशीर धर्मांतरण ठरवण्यात आलं आहे. या पद्धतीने केलेलं कोणतंही धर्मांतर हे बेकायदा धर्मांतर होणार आहे, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केलं. या कायद्यातील तरतुदींचं उल्लंघन करुन एखाद्याचं धर्मांतर केलं असेल तर धर्मांतर करणारी व्यक्ती किंवा संस्था हे शिक्षेस पात्र असतील. अशा पद्धतीने झालेलं धर्मांतर हे निरर्थक होईल. बेकायदेशीर धर्मांतर होऊन लग्न होतो. लग्न झाल्यानंतर विच्छेद होतो. त्यानंतर काय करायचं? याबाबत या कायद्यात तरतूद केलेली आहे. केवळ बेकायदेशीर धर्मांतराच्या प्रयोजनासाठी केलेला कुठलाही विवाह न्यायालयाद्वारे शुन्यवत किंवा निरर्थक असल्याचे घोषित करण्यात येईल. हे न्यायालय घोषित करेल. बेकायदेशीर धर्मांतरामुळे एखादा बालक जन्माला येत असेल तर त्या बालकाला कोणत्या जातीचं धर्माचं मानण्यात यावं? तर बालकाची आई ज्या पूर्वाश्रमीच्या धर्माची होती तोच त्या मुलाचा धर्म मानण्यात येईल. तथापि, आई आणि वडिलांच्या मालमत्तेत उत्तराधिकार मिळवण्याचा हक्का त्या बालकाचा कायम असेल. भारतीय नागरीक संहिता कलम १४४ च्या तरतुदीनुसार मेंटेनन्सकरता ते हकदार असतील. त्यासोबतच बाळाची कस्टडी आईकडे असेल.

# स्वांतत्र्यवीर भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांचा अमर बलिदान दिन कार्यक्रमाचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : देशाच्या स्वांतत्र्यसाठी आपले अमूल्य जीवनाची बलिदान दिलेली महान स्वांतत्र्यवीर भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांचा अमर बलिदान दिन कार्यक्रम २३ मार्च २५ रोजी होणार असून जय भारत माता सेवा समितीच्या राष्ट्रीय संस्थापक अध्यक्ष तथा राष्ट्रीय संत हवा मल्लिनाथ महाराज यांच्या दिव्यसानिध्यात यंदा काशी (वाराणशी) येथे आयोजित केले आहेत. या कार्यक्रमास जय भारत माता सेवा समिती सोलापूर शाखाच्या वतीने जय्यत तयारी करण्यात आले असून सोलापूर जिल्ह्यातून रेल्वे, जीप,क्लोजर सह विविध वाहनातून सुमारे दहा हजार पेक्षा अधिक देशभक्त उपस्थित राहण्या बाबत नियोजन केले आहेत.




या कार्यक्रमास महान क्रांतिकारी शहीद स्वातंत्र्य सैनिकांच्या कुटुंबातील सदस्य उपस्थित राहणार असून या मध्ये चंद्रशेखर आझाद यांच्या कुटुंबातील सदस्य अमित आझाद तिवारी, भगत सिंग यांच्या कुटुंबातील सदस्य यादविंदर सिंग संधु, राजगुरू यांच्या कुटुंबातील सदस्य, सत्यशील राजगुरू, अशफाकुल्ला यांच्या कुटुंबातील सदस्य, अलक उल्ला खान, उदम सिंग यांच्या कुटुंबातील सदस्य, हरपाल सिंग सुनम, झाशी राणी लक्ष्मीबाई यांच्या कुटुंबातील सदस्य, सुनील गोपाल राव, सुखदेव यांच्या कुटुंबातील सदस्य,अशोक थापर, कित्तूर राणी चन्नम्मा यांच्या कुटुंबातील सदस्य, सोमशेखर देसाई सांगोली रायण्णा यांच्या कुटुंबातील सदस्य, करवीरअप्पा रगन्नवार आदी मान्यवर उपस्थित राहणार आहे. देश वाशियांचे वतीने राष्ट्रीय संत हवा मल्लिनाथ महाराज यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करून सन्मान करण्यात येणार आहे. भारतातील सर्व शहीद झालेले क्रांतिकारक स्वातंत्र्य सैनिकांच्या बलिदानांचा आदर करण्यासाठी तसेच त्यांचे बलिदान हे कायम स्वरूपी देश वासीयांना सदा स्मरणात ठेवण्यासाठी सदर कार्यक्रम आयोजित केला आहे. हा कार्यक्रम कोणतीही राजकीय पक्षाशी किंवा कोणत्याही राजकीय नेत्याशी संबधित नाही. हा कार्यक्रम फक्त शहीद झालेले क्रांतिकारक स्वातंत्र्य सैनिकांच्या बलिदानांचा आदर करण्यासाठी व देशभक्ती वाढवण्यासाठी च्या उद्देशाने दर वर्षी साजरा केला जातो.

आपल्या देशाच्या स्वातंत्र्यासाठी, जनतेच्या कल्याणसाठी अनेक जाती धर्माचे हजारो वीर क्रांतिकारकानी स्वातंत्र्यापूर्वी बलिदान दिले आहे. तसेच सद्या भारत मातेच्या रक्षण करताना शहीद झालेल्या सर्व वीराना शतशः नमन करण्यासाठी २३ मार्च २०२६ रोजी काशी (वाराणशी) येथे पद्मविभूषण गिरिजादेवि संस्कृतिक संकूल,मकबूल आलाम रोड, चौकाघाट (उत्तर प्रदेश - २२१ ००२) सकाळी ११ वाजता अमर बलिदान कार्यक्रमास सुरवात करण्यात येणार आहे. काशि (वाराणाशि) उत्तर प्रदेश २२१००१ डी. ३५/७७ - जंगमवाडी मठ येथे निवसाची व्यवस्था करण्यात आली असून अधिक माहितीसाठी आर. के. स्वामी यांचा मो. क्रमांक ९४२२३ २११६६ वर सपंर्क साधावी.

**राष्ट्रीय संत हवा मल्लिनाथ महाराज यांच्या दिव्य सानिध्यात देशातील सर्व राज्यातील देश भक्त एकत्रित येवून वेगवेगळ्या राज्यामध्ये गेल्या सात वर्षांपासून अमर बलिदान कार्यक्रमाचे आयोजन केले जात आहे. या पूर्वी बंगलोर, दिल्ली,पंजाब येथील भगतसिंग यांचे गांव खटकर कलान येथे, तसेच भारत-पाकिस्तान सीमेवर हुसैनीवाला या गांवी करण्यात आले असून अक्कलकोट स्वामी समर्थ महाराज यांच्या पुण्य नगरीत तसेच गेल्या वर्षी तामिळनाडू राज्यातील रामेश्वर येथे अमर बलिदान दिन कार्यक्रम आयोजित केले होते. यंदा मात्र काशी (वाराणशी) येथे आयोजित केले आहे.**

**भारत देशासाठी महान कार्य केलेल्या महान व्यक्तीना त्यांच्या जातीमध्ये सीमित करू नये. त्यांना भारत देशाच्या उन्नतीसाठी प्रगतीसाठी वापरावे. कोणत्याही एका विशिष्ठ जाती धर्मासाठी सीमित करू नये. ते सर्व देशासाठी अमुल्य रत्न आहेत. सर्वांनी त्यांच्या जयंतीचे आचरण करावे. पण एका जाती पुरते करू नये. एकाच जाती, एकाच धर्मा मूळे संविधान वाचवता येत नाही. संविधान व निसर्ग वाचवायचे असेल तर सर्व जाती धर्माची आवश्यकता आहे. देश वाचला तर जाती, धर्म, पक्ष, परिवार, तुम्ही आम्ही वाचतो. देश वाचला नाही तर कोणीही वाचणार नाही. या विचाराने प्रेरित होऊन, आपल्याला देशासाठी सर्वांगीण एकता साधण्याची आवश्यकता आहे. जात धर्माचा विचार न करता, देशाचा विचार करा. राष्ट्रधर्म सर्वापेक्षा श्रेष्ठ आहे.हे लक्षात घेऊन, आपण एकत्र येऊन आपल्या देशाची सुरक्षिता साधावी .**

**_ राष्ट्रीय संत हवा मल्लीनाथ महाराज**
**जय भारत माता सेवा समितीच्या राष्ट्रीय संस्थापक**
**अध्यक्ष नवी दिल्ली**

## राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांना प्रतिष्ठेचा आंतरराष्ट्रीय पुरस्कार जाहीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्याच्या ऊर्जा, महिला व बालविकास, सार्वजनिक आरोग्य आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांना अमेरिकेतील 'आउटस्टँडिंग व्हिजनरी लीडर अँड ट्रू चेंजमेकर' हा प्रतिष्ठेचा आंतरराष्ट्रीय पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. हा पुरस्कार १४ मार्च २०२६ रोजी जाहीर करण्यात आला असून त्यांचा सत्कार २५ मार्च २०२६ रोजी सकाळी १० वाजता नवी दिल्ली येथील भारत मंडपममध्ये आयोजित विशेष समारंभात करण्यात येणार आहे.



राज्यमंत्री साकोरे-बोर्डीकर यांनी महाराष्ट्रात विशेषत: परभणी जिल्ह्यात ग्रामीण महिलांच्या सक्षमीकरणासाठी विविध उपक्रम राबवले आहेत.

## एनएचएआय १ एप्रिल २०२६ पासून आर्थिक वर्ष २०२६-२७ साठी फास्टॅगच्या वार्षिक पास शुल्कात सुधारणा करणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने (एनएचएआय) आर्थिक वर्ष २०२६-२७ साठी 'फास्टॅग वार्षिक पास'चे सध्याचे शुल्क ३००० रुपयांवरून ३,०७५ रुपयांपर्यंत वाढवण्याची घोषणा केली आहे. हे वाढीव शुल्क १ एप्रिल २०२६ पासून लागू होईल. शुल्कातील ही सुधारणा 'राष्ट्रीय महामार्ग शुल्क (दरांचे निर्धारण आणि वसुली) नियम, २००८' मधील तरतुदींनुसार करण्यात आली आहे. ५६ लाखांहून अधिक वापरकर्त्यांसह, खाजगी वाहन मालकांमध्ये' फास्टॅग वार्षिक पास'चा स्वीकार सातत्याने वाढत आहे. हे सुधारित दर राष्ट्रीय महामार्ग आणि राष्ट्रीय द्रुतगती मार्गावरील सुमारे १,१५० टोल प्लाझांवर वार्षिक पास सुविधा घेऊ इच्छिणाऱ्या वैध फास्टॅग असलेल्या पात्र गैर-व्यावसायिक वाहनांसाठी लागू असेल. फास्टॅग वार्षिक पासमुळे एकदाच शुल्क भरून एका वर्षाची वैधता किंवा २०० टोल प्लाझा क्रॉसिंगपर्यंत वारंवार फास्टॅग रिचार्ज करण्याची गरज राहत नाही. हा पास वैध फास्टॅग असलेल्या सर्व गैर-व्यावसायिक वाहनांसाठी लागू आहे. एकदाच शुल्क भरल्यानंतर राजमार्गयात्रा ॲप किंवा एनएचएआयच्या संकेतस्थळाद्वारे केलेल्या पेमेंटच्या दोन तासांच्या आत वाहनाशी लिंक असलेल्या विद्यमान फास्टॅग वर वार्षिक पास सक्रिय होतो.

# 'विनाकारण मुंबई महापौरांनाअशा प्रकारे टार्गेट करण योग्य नाही' : मुख्यमंत्री

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

शिर्डी (अहिल्यानगर) : मुंबई महापौरांच्या गाडीवर लाल दिवा (अंबर दिवा) नव्हता. तो त्यांच्या गाडीच्या बोनटवर होता. यात महापौरांचा काहीही दोष नाही. राज्यात कोणीही लाल दिवे वापरू नयेत'', असे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी केले आहे. ''विनाकारण महापौरांना टार्गेट केले जात असून अशा प्रकारे टार्गेट करणे योग्य नाही'', असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं.

राहुरी कृषी विद्यापीठात आज ३९ वा दीक्षांत सभारंभ कार्यक्रम झाला. या कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना डॉक्टर ऑफ सायन्स ही मानद पदवी प्रदान करण्यात आली आहे. या कार्यक्रमासाठी राज्यपाल जिष्णुदेव वर्मा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, कृषिमंत्री दत्ता भरणे, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि सभापती राम शिंदे उपस्थित राहिले. कार्यक्रमादरम्यान माध्यमांशी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, ''बारामती आणि राहुरी या दोन्ही विधानसभा मतदारसंघांच्या निवडणुकीची घोषणा झाल्यानंतर दोन्ही जागा बिनविरोध व्हाव्यात, असा आमचा प्रयत्न राहील. निर्णय सर्वांनी मिळून घ्यावा, असा आमचा प्रयत्न असेल. आमच्यावर निवडणुक लादली गेली तर ती लढविण्यास आमची तयारीदेखील आहे''असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं आहे.




गॅस आणि इंधन तुटवड्यावर बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की,'' केंद्र सरकारच्या निर्देशांप्रमाणे नागरिकांनी वागले पाहिजे. काही राजकीय पक्ष जाणीवपूर्वक नागरिकांमध्ये घबराट निर्माण करत आहे. त्यामुळे पॅनिक सिच्युएशन होऊन चांगली असलेली परिस्थिती खराब होण्याची शक्यता निर्माण होत आहे. लोकांच्या मनात अशा प्रकारची भीती निर्माण झाली तर लोक साठवणूक करतील. त्यामुळे लोकांच्या मनातील भीती काढून टाकणं गरजेचं आहे. केंद्र सरकार आपल्यासाठी सर्व गोष्टी पाहत आहे, यावर सर्वांनी विश्वास ठेवावा'', असेही यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

राज्यात गॅस सिलेंडर पुरवठ्याची काय आहे स्थिती? व्यावसायिक ठिकाणी वापरण्यात येणाऱ्या गॅस सिलेंडरचा पुरवठा मर्यादित होत असल्यानं अनेक ठिकाणी हॉटेल व्यवसाय अडचणीत आले आहेत. हॉटेल व्यावसायिकांकडून चूल, इंडक्शनचा वापर होत आहे. तर घरगुती गॅस सिलेंडरची बुकिंग केल्यानंतर २५ दिवसांनी सिलेंडर मिळू शकणार आहे. गॅस टंचाईच्या काळात जीवनावश्यक वस्तू कायदा लागू केल्यानं गॅस सिलेंडरचा साठा करणाऱ्यांवर कायदेशीर करण्यात येत आहे.

# सविता देशमुख यांचा कर्तृत्ववान महिला म्हणून सन्मान




निफाड/प्रतिनिधी : जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून नवजीवन एज्युकेशन सोसायटीच्या वतीने 'खेळ पैठणीचा, सन्मान नारीशक्तीचा' या विशेष कार्यक्रमाचे अतिशय उत्साहात आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्यात समाजातील विविध क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटवणाऱ्या सौ. सविता देशमुख यांचा 'कर्तृत्ववान महिला' म्हणून विशेष सत्कार करण्यात आला.

**मान्यवरांची उपस्थिती आणि सन्मान**

नवजीवन एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षा सौ. विजयाताई देशमुख यांच्या शुभहस्ते सौ. सविता देशमुख यांना सन्मानचिन्ह, देवून सन्मान करण्यात आला. महिलांच्या अंगभूत गुणांना वाव देण्यासाठी आणि त्यांच्या कष्टाची दखल घेण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

**स्त्री शक्तीचा जागर**

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना सौ. विजयाताई देशमुख म्हणाल्या की, आजची स्त्री ही केवळ चूल आणि मुलापुरती मर्यादित राहिलेली नाही. शिक्षण, समाजकारण आणि अर्थकारणात तिने स्वत:चे स्थान निर्माण केले आहे. सविता देशमुख यांच्यासारख्या कर्तृत्ववान महिलांचा सत्कार करताना संस्थेला सार्थ अभिमान वाटत आहे.

**खेळ पैठणीचा, सन्मान नारीशक्तीचा या कार्यक्रमाचे सिन्नर येथे भव्य आयोजन**

**'खेळ पैठणीचा' ठरला आकर्षणाचे केंद्र**

सत्कार समारंभानंतर महिलांसाठी 'खेळ पैठणीचा' हा मनोरंजनात्मक कार्यक्रम पार पडला. यामध्ये महिलांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत उखाणे, विविध खेळ आणि सांस्कृतिक सादरीकरणाने कार्यक्रमाची रंगत वाढवली. उपस्थित महिलांनी टाळ्यांच्या कडकडाटात सविताजींच्या कार्याचे कौतुक केले.

आयोजक:नवजीवन एज्युकेशन सोसायटी. संचालित पुष्पावती देशमुख नवजीवन डे स्कूल सिन्नर

प्रमुख उपस्थिती: सौ. विजयाताई देशमुख (अध्यक्षा), सिरीन दीदी देशमुख संचालिका, दुहिता व हर्षद गोळेसर सोनी टीव्ही इंडिया गॉट टॅलेंट फेम, विशेष आकर्षण भूषण कापडणे, राज्य मुख्याध्यापक संघाचे सचिव - एस बी देशमुख, तालुका अध्यक्ष - एल डी बेनके, नरेंद्र वाघ, बी बी पाटील ,मंगला पवार ,अनिता सूर्यवंशी,फड मॅडम ,गुजराथी मॅडम .

सत्कारमूर्ती: सौ. सविता देशमुख, वृषाली सानप

विशेष उपक्रम: खेळ पैठणीचा व नारीशक्ती सन्मान.


या कार्यक्रमासाठी संस्थेचे पदाधिकारी, शिक्षक वृंद, मोठ्या संख्येने महिला भगिनी आणि परिसरातील नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन संस्थेच्या वतीने करण्यात आले.

**हा सत्कार माझ्या एकटीचा नसून माझ्या पाठीशी उभे राहणाऱ्या प्रत्येक कष्टकरी महिलेचा आहे. नवजीवन एज्युकेशन सोसायटीने दिलेला हा सन्मान मला भविष्यात अधिक जोमाने काम करण्याची प्रेरणा देईल, असे भावोद्गार सत्काराला उत्तर देताना सौ. सविता देशमुख यांनी काढले.**

# हडपसर रेल्वे स्थानकाचा कायापालट! चौथ्या फलाटाला रेल्वे बोर्डाची मंजुरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : पुणे रेल्वे स्थानकावरील प्रवाशांचा ताण कमी करण्यासाठी 'सॅटेलाइट टर्मिनल' म्हणून विकसित करण्यात आलेल्या हडपसर स्थानकाच्या विस्ताराला आता गती मिळाली आहे. रेल्वे बोर्डाने हडपसर स्थानकावर चौथ्या फलाटाच्या बांधकामाला अधिकृत मंजुरी दिली आहे. यामुळे या भागातील हजारो प्रवाशांसाठी लांब पल्ल्याच्या गाड्या पकडणे अधिक सोयीचे होणार आहे.



सध्या हडपसर स्थानकावर तीन फलाट असून, येथून दररोज सुमारे चार हजार प्रवासी प्रवास करतात. नवीन फलाटामुळे हडपसर, मांजरी, वाघोली, खराडी आणि मगरपट्टा सिटी परिसरातील प्रवाशांना लांब पल्ल्याच्या गाड्यांसाठी मुख्य पुणे स्थानकावर जाण्याची गरज पडणार नाही. आयटी कंपन्यांत काम करणाऱ्या नोकरदार वर्गासाठी हे टर्मिनल अत्यंत सोयीचे ठरणार आहे. एक फलाट वाढल्यामुळे दिवसभरात किमान ३ ते ४ नवीन गाड्यांची सोय होणे शक्य होणार आहे. सध्या ४०० मीटर लांबीच्या (१४ डब्यांच्या गाड्यांसाठी) फलाटास मंजुरी मिळाली असली तरी, रेल्वे प्रशासन २४ डब्यांच्या गाड्यांसाठी ६५० मीटर लांबीच्या फलाटासाठी आग्रही आहे. या प्रकल्पासाठी सुमारे ७ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. तांत्रिक प्रक्रिया पूर्ण होताच निविदा काढल्या जातील.

रेल्वे जनसंपर्क अधिकारी हेमंत कुमार बेहरा यांनी दिलेल्या माहितीनुसार, हा विस्तार हडपसर स्थानकाची कार्यक्षमता वाढवणारा असून, नवीन गाड्या सुरू करण्यासाठी किंवा सध्याच्या गाड्यांचे थांबे वाढवण्यासाठी प्रशासनाला तांत्रिकदृष्ट्या अधिक सोपे जाणार आहे. लवकरच या स्थानकावरून रेल्वेगाड्यांची संख्या वाढणार असल्याने पुणेकरांचा प्रवास अधिक सुखकर होणार आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# कै.कल्याणराव इंगळे यांच्या १० व्या पुण्यस्मरण दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन

## कै.कल्याणराव इंगळे यांच्या १० व्या पुण्यस्मरण दिनानिमित्त मैंदर्गी रोड, समर्थ पार्क येथील कै.कल्याणराव इंगळे उद्यानाचे लोकार्पण व उद्यानातील महालक्ष्मी मंदीर सुशोभिकरण व पुजन; कै.कल्याणराव इंगळे अर्धपुतळ्याचे अनावरण



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : अक्कलकोट :येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे मा.चेअरमन व स्वामी सेवक कै.कल्याणराव उर्फ बाळासाहेब इंगळे यांच्या १० व्या पुण्यस्मरण दिनानिमीत्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती येथील श्री.वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान व कै.कल्याणराव इंगळे तंत्रनिकेतन महाविद्यालयाचे चेअरमन तथा नगरसेवक - स्वामी सेवक महेश इंगळे यांनी दिली.

बुधवार दिनांक १८ मार्च रोजी कै.कल्याणराव इंगळे यांच्या १० व्या पुण्यस्मरण दिनानिमीत्त श्री.वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे मुख्य पुरोहित प.पू.मोहनराव (गुरुजी) पुजारी, हिरेमठ गौडगांव संस्थानचे शिवाचार्यरत्न श्री.ष.ब्र.डॉ. जयसिध्देश्वर महास्वामीजी, जगद्गुरु बसवलिंगेश्वर महासंस्थान नागणसूर तुप्पीन मठाचे श्री.म.नि.प्र.डॉ. अभिनव बसवलिंग महास्वामीजी, अक्कलकोट विरक्त मठाचे श्री.म.नि.प्र. बसवलिंग महास्वामीजी, मादन हिप्परगा विरक्त मठाचे श्री.म.नि.प्र.अभिनव महाशिवलिंगेश्वर महास्वामीजी, हत्तीकणबस विरक्त मठाचे श्री.म.नि.प्र. प्रभूशांत स्वामीजी, अक्कलकोट शिवपूरीचे संस्थापक प.पू.डॉ.पुरूषोत्तम राजीमवाले महाराज, श्री.स्वामी समर्थ समाधी मठाचे वे.शा.प.पू.अण्णू महाराज पुजारी यांच्या दिव्य सान्निध्यात व माननीय आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी यांच्या अध्यक्षतेखाली मैंदर्गी रोड, समर्थ पार्क येथील कै.कल्याणराव इंगळे उद्यानाचे लोकार्पण व उद्यानातील महालक्ष्मी मंदीर सुशोभिकरण व पुजन तसेच कै. कल्याणराव इंगळे अर्धपुतळ्याचे सकाळी १० वाजता अनावरण व मालार्पण होईल.

> **महास्वामीजींच्या दिव्य सानिध्यात व मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत कै. कल्याणराव इंगळे यांच्या अर्ध पुतळ्यास करण्यात येणार अभिवादन**

या नंतर देवस्थान संचलित कै. कल्याणराव इंगळे तंत्रनिकेतन महाविद्यालयात देवस्थानचे व महाविद्यालयाचे माजी चेअरमन कै. कल्याणराव इंगळे व कै.उमेश इंगळे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ कै. कल्याणराव इंगळे तंत्रनिकेतन महाविद्यालयातील कै.कल्याणराव इंगळे यांच्या अर्धपुतळ्यास व कै.उमेश इंगळे यांच्या प्रतीमेस महास्वामीजी यांच्या दिव्य सान्निध्यात मान्यवरांच्या हस्ते अभिवादन सोहळा संपन्न होईल.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी, श्री.स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे भोसले, महाराष्ट्र राज्य शिवभक्त प्रतिष्ठानचे पै.अनिकेतभाऊ घुले, करमाळा पंचायत समितीचे मा.सभापती संपतराव शिंदे, कराड येथील हुतात्मा बहुउद्देशीय अपंग कल्याणकारी संस्थेचे अध्यक्ष सुनील फडतरे, पुणे येथील यश कल्याणी सेवाभावी संस्थेचे चेअरमन गणेश करे-पाटील, मडगाव गोवा येथील श्री स्वामी समर्थ मंदिराचे संस्थापक जयेश नाईक, माजी पंचायत समिती सदस्य सिद्धेश्वर स्वामी, चिपळूण येथील उद्योजक डॉ.विलास मोरे, डॉ. विजय माटे श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, संपतराव शिंदे, उज्वलाताई सरदेशमुख आदी उपस्थित राहणार आहेत.

यानंतर कै.कल्याणराव इंगळे यांच्या १० व्या पुण्यस्मरण दिनानिमीत्त कै.कल्याणराव इंगळे तंत्रनिकेतन आणि श्री स्वामी समर्थ रूग्णालयात विविध उपक्रम संपन्न होतील. या उपक्रमांचा शुभारंभ मान्यवरांच्या हस्ते होईल.

यामध्ये आरोग्य शिबीर, क्युप्रेशर शिबीर, रक्तदान शिबीर, सोलापूर जिल्हा इंग्रजी कार्यशाळा, कै.कल्याणराव इंगळे तंत्रनिकेतन कडून गुणीजन पुरस्कार, कराड येथील हुतात्मा अपंग बहूउद्देशीय विकास कल्याणकारी संस्थेच्या वतीने गुणीजनांना राष्ट्रीय पुरस्कार, महाप्रसाद, श्री.स्वामी समर्थ रुग्णालयात जनरल फिजीशीयन डॉ.स्वप्निल हिप्परगी, डॉ.रोहित कुंभार, नेत्ररोग तज्ञ डॉ.स्वप्ना हिप्परगी, डॉ.राजेश मलंग, दंतरोग तज्ञ डॉ.नम्रता पवार यांच्या वतीने सर्वरोग निदान आरोग्य शिबीर संपन्न होणार आहे, तरी गरजू रुग्णांनी या आरोग्य शिबीराचा लाभ घ्यावा असे आवाहन मंदीर समितीचे चेअरमन तथा नगरसेवक महेश इंगळे, प्रथमेश इंगळे यांनी केले आहे.

---

# तहसीलदारांच्या अचानक भेटीने भारावले चिमुकले




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड /प्रतिनिधी : नवनवीन संकल्पना, उपक्रम, लोकाभिमुख कामकाज अशा आगळ्यावेगळ्या कामकाज पद्धतीने निफाड तालुक्यात अल्पावधीतच नेक कार्याचा ठसा उमटवणारे तहसीलदार विशाल नाईकवाडे यांचा सुखद अनुभव पालखेड येथील महाराष्ट्र शिक्षण संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूल विद्यालयातील विद्यार्थ्यांना अनुभवयास मिळाला.याचे निमित्त ठरले पालखेड येथे असणाऱ्या प्रशासकीय कार्यक्रमाचे, तहसीलदार नाईकवाडे आपल्या प्रशासकीय फौजफाट्यासह चक्क कार्यक्रमाआधीच सकाळी सर्वांच्या लवकर पालखेड येथे उपस्थित झाले.

यावेळी त्यांची नजर कार्यक्रमाजवळच असलेल्या शाळेच्या कमानीकडे गेली आणि त्यांनी अचानकपणे न्यू इंग्लिश स्कूल, पालखेड विद्यालयास भेट दिली.

याप्रसंगी तहसीलदार विशाल नाईकवाडे यांनी थेट वर्गात प्रवेश करून चिमुकल्यांशी मनमोकळा संवाद साधला. त्यांनी प्रशासकीय सेवा, स्पर्धेचे युग, विद्यार्थ्यांना उपलब्ध असणाऱ्या संधी,अभ्यासाचे सातत्य, एकाग्रता, आजच्या विद्यार्थ्यांसमोर असणारी आव्हाने आदींसह विविध मुद्द्यांना हात घातला.यावेळी विद्यार्थ्यांना त्यांनी प्रश्न देखील विचारले. त्यानंतर शाळेचे प्रशासकीय कामकाज, नूतन इमारत, प्रयोगशाळा,संगणक कक्ष, शिक्षक दालन, क्रीडांगण, इयत्ता दहावीचे निकाल, शाळेत राबविले जाणारे नवनवीन उपक्रम, आदींसह शाळेच्या शैक्षणिक प्रगतीचा आढावा घेऊन ग्रामीण भागातील पालखेड विद्यालयाच्या शैक्षणिक दर्जाबाबत समाधान व्यक्त केले.यावेळी तहसीलदार विशाल नाईकवाडे यांचा मुख्याध्यापक अशोक शेळके




यांनी शाल,पुष्पगुच्छ देवून सन्मान केला.याप्रसंगी मुख्याध्यापक अशोक शेळके, निलेश गवांदे, दीपक देशमुख, हेमंतकुमार होलगडे, सुनंदा दुर्धवळे, संजय लव्हांगडे, मंगेश कागदे, शैलेश शिखरे, किरण थेटे, राहुल दवते, वैशाली मोते,सागर जाधव, राजेंद्र नाठे, संदीप आहेर, दत्तात्रय पगार, सावन जाधव, संजय कोकतरे, कविता ढोमसे, सारिका पवळे, सुरेश गांगुर्डे, रामदास पवार, नदीम तांबोळी आदींसह विद्यार्थी उपस्थित होते.

---

# पांडुरंग कारखाना येथे ऊस विकास ए आय तंत्रज्ञान वापराबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पांडुरंग सहकारी साखर कारखान्यात ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी पारंपारिक शेती पिकाकडे दुर्लक्ष करून अत्याधुनिक पद्धतीने शेती करावी. यासाठी श्रीपुर येथील कर्मयोगी सुधारबंद परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखाना येथे शेतकऱ्यांसाठी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापरापासून ऊस पिक घेणाऱ्या शेतकऱ्यांसाठी कार्यशाळेची आयोजन करण्यात आले होते.

या कार्यशाळेत पुणे येथील वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट चे तज्ञ डॉक्टर समाधान सुरवसे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी डॉक्टर तुषार शितोळे अजित वागसे, अरुण पडोळ, कारखान्याची कार्यकारी संचालक यशवंत कुलकर्णी, शेती अधिकारी संतोष कुमठेकर सोमनाथ भालेकर महेश देशपांडे आधी उपस्थित होते, यावेळी डॉक्टर समाधान सुरवसे म्हणाले की शेतकऱ्यांनी पारंपारिक शेती न करता आता अत्याधुनिक पद्धतीने शेती करणे गरजेचे आहे. सध्या उशीती करताना ए आय. तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येत आहे. यात आता त्याच्या वापरामुळे ऊसाला रासायनिक खते व पाणी योग्य प्रमाणात वापरले जाते. तसेच उसाचे उत्पादन १५ ते २० टक्क्यांमध्ये वाढ होते. त्यामुळे शेतकरी याचा वापर शेतीमध्ये करून येत अस ल्याचे दिसून येत आहे.

यावेळी कार्यकारी संचालक यशवंत कुलकर्णी म्हणाले की पांडुरंग कारखाना शेतकऱ्यांना जनतेत जास्त फायदा व्हावा यासाठी प्रयत्न करत आहे. यासाठी वेगवेगळे शेतकरी मार्गदर्शन शिबिरे आयोजन करण्यात येत आहे. स्वर्गीय सुधाकरपंत परिचारक यांच्या मार्गदर्शनाखाली चेअरमन भाजपचे ज्येष्ठ नेते माजी आमदार प्रशांत परिचारक यांच्या मार्गदर्शनाखाली कारखान्याचे चांगल्या प्रकारचे नियोजन आहे. त्यामुळे कारखान्याकडे ऊस देण्याचे अनेक शेतकऱ्यांची ओढ आहे. अशी दिसून येत आहे तरी कारखाने चालू हंगामातील २०२५ २६ मधील एफ आर पी दिलेले आहे.

---

# निफाड उपजिल्हा रुग्णालयात एच.पी.व्ही कर्करोग प्रतिबंधक लसीकरणाचा शुभारंभ




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड येथील उपजिल्हा रुग्णालयात ९ ते १४ वयोगटातील मुलींसाठी कर्करोग प्रतिबंधक एच.पी.व्ही (ह्युमन पॅपिलोमा व्हायरस) लसीकरण मोहिमेचा आज दि.१६ मार्च रोजी शुभारंभ करण्यात आला.

मा.जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.सतीश शिंपी, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ.संदीप सूर्यवंशी व डॉ.बाळू पाटील यांचे आदेशानुसार तसेच उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.राजीव तांभाळे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडला.

कार्यक्रमाची सुरुवात रुग्ण कल्याण समिती सदस्य मधुकर शेलार यांच्या हस्ते धन्वंतरी मातेची पूजा करून व दीपप्रज्वलनाने करण्यात आली.

प्रास्ताविकात स्त्रीरोग तज्ञ डॉ. निलेश लाड यांनी एच.पी.व्ही लसीकरणाबाबत जनजागृतीची गरज अधोरेखित केली. महिलांमध्ये आढळणाऱ्या गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगापासून बचाव करण्यासाठी एच.पी.व्ही लस अत्यंत प्रभावी असून एच.पी.व्ही हा संसर्गजन्य विषाणू असून त्याच्या संसर्गामुळे महिलांमध्ये गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग होण्याची शक्यता वाढते. त्यामुळे योग्य वयात लस घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. ९ ते १४ वर्षे वयोगटातील मुलींना एच.पी.व्ही लसीचे दोन डोस दिले जातात, तर १५ वर्षांपेक्षा जास्त वयोगटातील तरुणींना तीन डोस देण्यात येतात. योग्य वेळी लसीकरण केल्यास भविष्यातील गंभीर आजारांपासून संरक्षण मिळू शकते, असे त्यांनी स्पष्ट केले.



रुग्ण कल्याण समिती सदस्य मधुकर शेलार यांनी, महिलांनी नियमित आरोग्य तपासणी व पॅप स्मिअर चाचणी करून घेणे महत्त्वाचे आहे. ज्या मुलींना ही लस घ्यावयाची असेल त्यांनी पालकांसह निफाड उपजिल्हा रुग्णालयात संपर्क साधावा. संपर्कासाठी इन्चार्ज सिस्टर संजीवनी फणसे, जगताप तसेच मेट्रन दाभाडे यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन केले.

> **एच.पी.व्ही लस ही गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगापासून संरक्षण देणारी अत्यंत महत्त्वाची आणि सुरक्षित लस आहे. लस घेतल्याने वंध्यत्व येते किंवा ही लस फक्त विवाहित महिलांसाठी आहे, असा समज अत्यंत चुकीचा आहे. उलट किशोरवयात किंवा विवाहापूर्वी ही लस घेणे अधिक प्रभावी ठरते. ही लस सुरक्षित असून तिचे दुष्परिणाम अत्यंत कमी प्रमाणात आढळतात. त्यामुळे पालकांनी आपल्या मुलींना योग्य वयात ही लस देण्यासाठी पुढाकार घ्यावा.**
>
> **- डॉ.राजीव तांभाळे**
> **वैद्यकीय अधिक्षक, निफाड ग्रामीण रुग्णालय**

---

**अन्यथा विधानमंडळात लक्षवेधी मांडणार; आमदार सिद्धार्थ खरात**

# पाण्यासाठी बलिदान देणाऱ्या कैलास नागरे यांच्या पत्नीला पोलीस पाटील म्हणून नियुक्त करा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे/ बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : सिंदखेड राजा भगवान साळवे शेतीसाठी पाणी मिळावे या मागणीसाठी आमरण उपोषण करून अखेर बलिदान देणारे शिवनी आरमाळ येथील कैलास नागरे यांच्या मृत्यूला एक वर्ष पूर्ण झाले असले तरी त्यांच्या कुटुंबाला शासनाकडून अद्याप कोणतीही ठोस मदत मिळालेली नाही. या पार्श्वभूमीवर आमदार सिद्धार्थ खरात यांनी शिवनी आरमाळ येथे जाऊन नागरे कुटुंबाची भेट घेतली व त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. शासनाने आतापर्यंत या कुटुंबाकडे दुर्लक्ष केल्याबद्दल त्यांनी तीव्र संताप व्यक्त केला. मुख्यमंत्र्यांनी या कुटुंबाचे पालकत्व स्वीकारले मात्र अद्याप पर्यंत कोणताच लाभ दिला नाही तो तात्काळ द्यावा एवढेच नव्हे तर कैलास नागरे यांची पत्नी पत्नी स्वाती नागरे यांना पोलीस पाटील म्हणून शासकीय नोकरीत समाविष्ट करून घ्या अशी मागणी करत जर त्यांना नोकरी दिली नाही आणि त्यांच्या मुलांना शिक्षणासाठी मदत केली नाही तर या संदर्भात आपण विधानमंडळात लक्षवेधी मांडू असा खणखणीत इशाराही आमदार खरात यांनी दिला



कैलास नागरे यांनी शेतीसाठी पाणी मिळावे, खडकपूर्णा धरणाच्या डाव्या कालव्यातून परिसरातील १४ गावांना पाणी मिळावे तसेच वाया जाणारे पाणी धरणात सोडण्यात यावे या मागण्यांसाठी आमरण उपोषण केले होते. मात्र त्यांच्या मागण्यांवर तोडगा न निघाल्याने अखेर त्यांनी पाण्यासाठी आपले बलिदान दिले. या घटनेला आता एक वर्ष पूर्ण झाले असले तरी त्यांच्या कुटुंबाला शासनाकडून कोणतीही ठोस मदत मिळालेली नाही.

आमदार सिद्धार्थ खरात यांनी नागरे यांच्या घरी भेट देऊन स्वाती कैलास नागरे यांच्याशी चर्चा केली. यावेळी स्वाती नागरे यांनी आपल्या अडचणी व समस्या आमदार खरात यांच्यासमोर मांडल्या. त्यानंतर आमदार खरात यांनी तात्काळ जिल्हाधिकारी किरण पाटील व उपविभागीय अधिकारी संजय खडसे यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधत स्वाती नागरे यांना विशेष बाब म्हणून शासकीय सेवेत पोलीस पाटील म्हणून नियुक्त करण्याची मागणी केली.

याशिवाय कैलास नागरे यांच्या मुलीच्या शिक्षणासाठी आर्थिक मदत देण्याचीही मागणी त्यांनी प्रशासनाकडे केली. शासनाने आतापर्यंत या कुटुंबाकडे दुर्लक्ष केल्याबद्दल त्यांनी तीव्र संताप व्यक्त केला. जर शासनाने नागरे कुटुंबाला शासकीय नोकरीत समाविष्ट करून घेतले नाही व तात्काळ मदत केली नाही, तर या संदर्भात विधानमंडळात लक्षवेधी मांडणार असल्याचा इशाराही आमदार खरात यांनी दिला.

यापूर्वी कैलास नागरे यांच्या बलिदान नंतर सर्वप्रथम विधानभवनात हा प्रश्न आमदार सिद्धार्थ खरात यांनीच उपस्थित केला होता. त्यांच्या प्रयत्नांतून विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्या हस्ते नागरे कुटुंबाला पाच लाख रुपयांची आर्थिक मदत देण्यात आली होती. आता पुन्हा एकदा आमदार खरात यांनी नागरे कुटुंबाला न्याय मिळवून देण्यासाठी पुढाकार घेतला आहे.

यावेळी शिवसेनेचे सिंदखेड राजा तालुका अध्यक्ष आत्माराम शेळके, मेहकर शिवसेना उभाटा तालुका अध्यक्ष निंबाभाऊ पांडव बद्री बोडके, सिद्धेश्वर आंधळे यांसह इतर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# बदलापूर येथील रॉयल रिसॉर्ट येथे भाजपा घाटकोपर पश्चिम विधानसभेच्या तिन्ही मंडळांचा दोन दिवसीय जिल्हा प्रशिक्षण वर्ग संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई/केतन भोज : भारतीय जनता पार्टी घाटकोपर पश्चिम विधानसभेचे आमदार राम कदम तसेच ईशान्य मुंबई जिल्हा उपाध्यक्ष अनिल भाई निर्मळे यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक १४ व १५ मार्च रोजी घाटकोपर पश्चिम मधील कार्यकर्त्यांसाठी बदलापूर येथील रॉयल रिसॉर्ट याठिकाणी घाटकोपर पश्चिम विधानसभेच्या तिन्ही मंडळांचा दोन दिवसीय आयोजित पंडित दीनदयाल उपाध्याय प्रशिक्षण महाशिबीर वर्ग पार पडला.या दोन दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळेत पक्षाची विचारधारा, संघटनात्मक बळकटी तसेच कार्यकर्त्यांची भूमिका अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने एकूण सात सत्रांचे आयोजन यावेळी यामध्ये करण्यात आले होते. कार्यकर्त्यांना संघटनात्मक बळकटी, संवाद कौशल्य, पक्षाने केलेली कार्य, त्याची उद्दिष्टे आणि डिजिटल माध्यमांचा प्रभावी वापर याबाबत महत्त्वपूर्ण माहिती यावेळी देण्यात आली. या संपूर्ण प्रशिक्षण कार्यक्रमात जिल्हा महामंत्री लालजी यादव, चंद्रकांत मालकर, हेमेंद्र शृंगारे यांची विशेष उपस्थिती होती. तसेच या प्रशिक्षण सत्रामध्ये आमदार मिहीर कोटेचा, सौ.अश्विनी कराडे, भालचंद्र शिरसाट, अवधूत वाघ आणि विपीन तिवारी यांनी भारतीय जनता पार्टीचा गौरवशाली इतिहास,पक्षाची कार्यपद्धती आणि मजबूत संघटन उभारणी याबाबत उपस्थित कार्यकर्त्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले.या कार्यशाळेमुळे कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून, पक्ष संघटन अधिक मजबूत करण्यासाठी सर्व कार्यकर्ते नव्या ऊर्जेसह कार्यरत राहून निश्चितच पुढील काळात पक्ष आणि संघटन बळकट होण्यास यासाठी मदत होईल असा विश्वास यावेळी संतोष गांजले - मंडळ अध्यक्ष पार्कसाईट घाटकोपर पश्चिम विधानसभा यांनी व्यक्त केला.





# उजनीत होणारे जल प्रदूषण रोखण्यासाठी शंभर कोटीची तरतूद करा

## अर्थसंकल्पीय अधिवेशनात आ. समाधान आवताडे यांची लक्षवेधी




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : महाराष्ट्र शासनाने उजनी धरणावर पर्यटन स्थळ उभारण्यास मंजुरी दिली असून ५४१ कोटी १८ लाखाचा आराखडा तयार झाला आहे यामध्ये महाराष्ट्रात पर्यटन वाढीसाठी अनेक उपक्रम राबवले जाणार असून राष्ट्रीय दर्जाचे कृषी पर्यटन स्थळ उजनी धरणावर उभारण्यात येणार आहे,मात्र विविध भागातून उजनीत येणाऱ्या रसायन मिश्रित पाण्यामुळे उजनीचे प्रदूषण वाढत असून ते पाणी पूर्णपणे प्रदूषित होऊन आरोग्याचा धोका निर्माण झाला आहे यासाठी पर्यटन विकासासाठी मंजूर झालेल्या रकमेतून १०० कोटी उजनीच्या पाण्याचे प्रदूषण कमी करण्यासाठी वापरणार का? हा प्रश्न आमदार समाधान आवताडे यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात केला.

पुढे बोलताना आमदार समाधान आवताडे म्हणाले की सोलापूर जिल्ह्याची अर्थव्यवस्था उजनी धरणावर अवलंबून असून सोलापूर साठी उजनी धरण वरदानी म्हणून धरणाकडे पाहिले जाते पिकाच्या व पिण्याचा पाण्याचा प्रश्न या धरणावरून सुटत आहे मात्र या धरणातील जल प्रदूषण मोठ्या प्रमाणात वाढले असल्यामुळे यावर उपाययोजना करणे गरजेचे आहे त्यासाठी शासनाने प्रदूषण कमी करण्यासाठी पावले उचलणे अत्यंत गरजेचे असल्याची बाब आमदार समाधान आवताडे यांनी शासनाच्या निदर्शनास आणून दिली.

उजनी धरण सोलापूर नगर व पुणे या जिल्ह्यात पसरलेले असून १४५ किलोमीटर परिसरात पाणी पसरलेले असते धरणाजवळून सोलापूर पुणे राष्ट्रीय महामार्ग गेला असल्याने जल पर्यटनासाठी ही जमेची बाजू आहे,याशिवाय दक्षिण व उत्तर भारताला जोडणारा रेल्वे मार्ग कुर्डूवाडी भिगवन या पट्ट्यातूनच गेला आहे.पंढरपूरचा पांडुरंग, तुळजापूरची तुळजाभवानी,अक्कलकोटचे स्वामी समर्थ यांच्या दर्शनासाठी महाराष्ट्र विविध राज्यातील भाविक सोलापुरात येतात त्यामुळे त्यांच्यासाठी उजनीवर झालेले जल पर्यटन आनंदाची पर्वणी ठरणार आहे त्यामुळे शासनाने हा जल पर्यटनाचा निर्णय घेतला असला तरी याबरोबर उजनीचे पाणीही स्वच्छ व आरोग्यदायी राहिले पाहिजे यासाठी स्वतंत्र निधीची उपलब्धता करून जल प्रदूषणावर ही शासनाने काम करावे अशी मागणी आमदार समाधान आवताडे यांनी केली आहे

या प्रश्नाला उत्तर देताना कृषी मदत पुनर्वसन वित्त राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी सांगितले की मुख्यमंत्र्यांची बैठक लावली असून या बैठकीमध्ये यावरती निर्णय घेण्यात येईल.

# स्वेरीच्या विद्यार्थ्यांचे 'डिपेक्स २०२६' मध्ये यश



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) च्या कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरिंग या विभागात दुसऱ्या वर्षात शिक्षण घेत असलेले ओंकार बालाजी इंगळे, संदिप राजेंद्र गवळी, प्रतीक्षा शिवाजी ढेरे, पूजा भीमाशंकर मुस्के, शिवानी गणेश माळवे व तनिष्का उमेश कारंडे या सहा विद्यार्थ्यांना एमआयटी महाविद्यालय, संभाजीनगर येथे घेतलेल्या 'डिपेक्स २०२६' या राज्यस्तरीय प्रोजेक्ट कॉम्पिटिशनमध्ये डिफेन्स न्ड सायबर सिक्युरिटी या प्रवर्गात ' एथिकल इमेल ट्रॅकिंग नालायझर विथ इंटिग्रेटेड वेब स्क्रॅपिंग फॉर रिअल टाईम पॉलिसी मॉनिटरिंग' या प्रकल्पासाठी द्वितीय क्रमांकाचा पुरस्कार मिळाला आहे.

महाराष्ट्र आणि गोवा या राज्यांतील विद्यार्थ्यांसाठी संभाजीनगर मध्ये आयोजित केलेले 'डिपेक्स २०२६' हे एक महत्त्वाचे राज्यस्तरीय प्रदर्शन होते. 'डिपेक्स' या उपक्रमाचे आयोजन दरवर्षी विविध शैक्षणिक संस्थांमध्ये केले जाते. त्यामध्ये नवीन प्रकल्पांचे सादरीकरण केले जाते. दि. ५ मार्च ते ०८ मार्च २०२६ दरम्यान झालेले राज्यस्तरीय प्रदर्शन हे अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, सृजन, महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, छत्रपती संभाजीनगर आणि महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ (एमएसबीटीई) यांनी आयोजित केले होते. या राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये दोन हजार पाचशेहून अधिक प्रकल्पांची नोंदणी झाली होती. या उपक्रमांतर्गत सुमारे ३५० मॉडेलसचे प्रदर्शन करण्यात आले तर सुमारे ८ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांनी या परिषदेमध्ये सहभाग घेतला होता. 'डिपेक्स २०२६' या राष्ट्रीय परिषदेमध्ये एकूण १२ प्रकारांमध्ये प्रकल्प सादर करण्यात आले होते. 'डिपेक्स' या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी आपल्यातील नाविन्यतेची, संशोधनाची आणि तांत्रिक कौशल्यांची क्षमता वाढवण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिल्याचे दिसून येते. त्यामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या प्रकल्पांचे सादरीकरण करण्यासाठी एक व्यासपीठ मिळते, ज्यामुळे त्यांच्या करिअरच्या विकासास मदत होते. यावेळी स्वेरीच्या वतीने संस्थेचे अध्यक्ष अशोक भोसले व मान्यवरांच्या उपस्थितीत यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. या प्रकल्पासाठी विद्यार्थ्यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूरच्या विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. प्रशांत पवार व डॉ. स्वाती पवार तसेच विभागप्रमुख डॉ. प्राजक्ता सातारकर यांचे मार्गदर्शन लाभले. संस्थेचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) चे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे, संस्थेचे अध्यक्ष अशोक भोसले, उपाध्यक्ष सुरेश राऊत, सचिव डॉ. सुरज रोंगे, संस्थेचे इतर पदाधिकारी व विश्वस्त, कॅम्पस इनचार्ज डॉ. एम. एम. पवार, स्वेरी अंतर्गत असलेल्या चारही महाविद्यालयांचे प्राचार्य, डिग्री इंजिनिअरिंगच्या उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, कॉम्प्यूटर सायन्स अँड इंजिनिअरिंगचे विभागप्रमुख, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी यशस्वी सहा ही विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# नगर परिषदेमध्ये नवीन पायंडा: गटनेते यांच्यासाठी नगरपालिकेमध्ये खास कक्ष

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर नगरीत परिषदेमध्ये गेल्या ३० वर्षापासून नगराध्यक्षाला दालन होते. आता मात्र नगर परिषदेमध्ये नवीन पायंडा वाढण्यात आला आहे. उपनगराध्यक्ष, भाजप गटनेते, व शहर विकास आघाडीचे नेते, यांना प्रत्येकाला नगरपालिकेमध्ये बसण्यासाठी तीन नवीन कक्ष उभारण्यात आले आहे.

पंढरपूर नगर परिषदेच्या निवडणुकीमध्ये भाज प व परिचारक गटाची सत्ता आली आहे मात्र लोकनियुक्त नगराध्यक्ष तीर्थक्षेत्र विकास आघाडीच्या डॉक्टर प्रणिता भालके आहेत. गेल्या ३० वर्षापासून पंढरपूर नगरी परिषदेमध्ये नगराध्यक्ष पदासाठी दालन आहे. उपनगराध्यक्ष पदासाठी दालन नाही. मात्र नगरपरिषदेच्या पहिल्या सभेमध्ये उपनगराध्यक्ष महादेव धोत्रे यांच्यासाठी खास दालन सुरू करावी अशी मागणी करण्यात आली.

पंढरपूर नगर परिषदेमध्ये भाजपचे गटनेते म्हणून भागवत बडवे, यांची तर शहर विकास आघाडी म्हणून गटनेते म्हणून यांना सर्वांना नगरपरिषदेमध्ये बसण्यासाठी दालन हवे आहे त्यामुळे पंढरपूर नगर परिषदेमध्ये तीन कक्ष उभारण्यात आले आहे. याची चर्चा राजकीय वर्तुळात पंढरपूर शहरांमध्ये रंगू लागली आहे.

# आपल्या मातीला कधीही विसरू नका : स्वानंद बेदरकर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : विद्यार्थी मित्रांनो कलेचा उगमच ग्रामीण भागातच होतो. तुम्ही ज्या मातीत श्वास घेता त्या मातीला कधीही विसरू नका. हीच माती तुमच्यावर संस्कार करत असते. याच मातीच्या संस्काराचं मोल ज्यांनी जाणलं त्यातून निसर्ग कन्या बहिणाबाई चौधरी, निसर्ग कवी ना. धों. महानोर जगाला माहिती झाले. म्हणून आपल्या या मातीशी कधीही प्रतारणा करू नका. हीच माती तुम्हाला जगात तुमची ओळख निर्माण करण्यास मदत करेन. मातीच मेहनत करायला शिकवते. एक दाणा तिच्यात पेरला की हजार दाणे उगवून येतात. हे तिनं दाखवून दिलं. म्हणून आपल्याला तिच्याकडून मेहनतीचा मंत्र घ्यायचा आहे. यश निश्चितच तुम्हास मिळणार. असे प्रतिपादन प्रसिद्ध व्याख्याते आणि कवी स्वानंद बेदरकर यांनी केले.



काकासाहेबनगर येथील के. के. वाघ शिक्षण संस्था संचलित के. के. वाघ महाविद्यालयाच्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. त्यांनी पुढे बोलताना ग्रामीण भागातील लोकसाहित्याच्या धनाचं महत्त्व पटवून देतांना लोकगीत सादर करत विद्यार्थ्यांची दाद मिळवली.

### काकासाहेबनगर महाविद्यालय-वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ

अध्यक्षस्थानी संस्थेचे जनसंपर्क संचालक अजिंक्य वाघ होते. त्यांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकातून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. एल. जाधव यांनी विद्यार्थ्यांमधील क्रियाशीलता आणि प्रतिभा जाणून घेण्यासाठी त्यांच्या कलागुणांना वाव मिळावा म्हणून विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आल्याचे सांगितले.

व्यासपिठावर समन्वयक डॉ. व्ही. एम. सेवलीकर, महाविद्यालय विकास समितीचे सदस्य रामभाऊ पाटील, रघुनाथ कोल्हे, रामनाथ पानगव्हाणे महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. अतुल गवारे, आय. क्यू. ए. सी. समन्वय प्रा. मिलिंद पवार, सांस्कृतिक विभाग प्रमख डॉ. अरुण ठोके, प्रा नीलेश आहेर उपस्थित होते.

शैक्षणिक व सहशैक्षणिक उपक्रमांत विविध स्पर्धांतून यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांना प्रमुख अतिथींच्या हस्ते सन्मानपत्र, स्मृतिचिन्ह व पदके देऊन गौरवण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सुनीता शिरसाठ आणि आभार डॉ. प्रतिभा बाहेकर यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

### विविध क्षेत्रातील महिलांचा सन्मान करून स्त्रीशक्तीचा गौरव

# निफाडला जागतिक महिला दिनानिमित्त 'सन्मान स्त्री शक्तीचा' कार्यक्रम संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : जागतिक महिला दिन तसेच भारतीय जनता पार्टीचे जिल्हा चिटणीस संजय गाजरे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधत श्री साई उद्योग समूह च्या वतीने 'सन्मान स्त्री शक्तीचा' हा कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला. या प्रसंगी संजय गाजरे यांचे जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटनही या वेळी करण्यात आले.




कार्यक्रमाचे उद्घाटन भाजप प्रदेश सचिव सौ. भैरवीताई पलांडे-वाघ तसेच माजी जिल्हा परिषद सदस्या व पिंपळगाव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालिका श्रीमती अमृताताई पवार यांच्या हस्ते संपन्न झाले. या प्रसंगी समाजातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा मानाचा फेटा बांधून व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

भैरवीताई पलांडे-वाघ /व अमृताताई पवार यांनी संजय गाजरे यांच्या सामाजिक कार्याचे कौतुक केले. मकरसंक्रांती निमित्त प्रभागातील महिलांच्या घरांवर त्यांच्या नावाच्या नेमप्लेट लावून देण्याचा उपक्रम तसेच गेल्या वर्षापासून प्रभागातील १८ ते ७० वयोगटातील नागरिकांसाठी अपघात विमा काढण्याच्या उपक्रमाचे त्यांनी विशेष अभिनंदन केले.

कार्यक्रमात विविध क्षेत्रातील महिलांचा सन्मान करून स्त्रीशक्तीचा गौरव करण्यात आला.

याप्रसंगी भाजप जिल्हा उपाध्यक्ष संजयजी वाबळे, जिल्हा सरचिटणीस गोविंदराव कुशारे, निफाडच्या नगराध्यक्षा सौ. कांताबाई कर्डिले, नगरसेविका रूपालीताई रंधवे, नयना निकाळे, नगरसेवक जावेद शेख, तसेच जावेदभाई शेख, सोपान काका खालकर, मुकुंदराव धारराव, अरबाज पठाण, आकाश मोरे, साहेबराव कापसे, धनंजय नागरे, दीपक कुंदे, दिलीप आबा कापसे, मधुकर शेलार, सुनील गाजरे, प्रकाश गाजरे, गाजरे परिवारातील सदस्य, नितीन भाऊ कापसे, रघुनाथराव खापरे, अशोक शेठ पोफळिया, प्रकाश शेठ सुराणा, रामदास तात्या व्यवहारे, साहेबराव बर्डे, बापूसाहेब कुंदे, श्रीपतराव कापडी, विजयकुमार गजभिये, शिवाजीराव भोकनळ, सुनील व्यवहारे, रामदास नाना कर्डिले, ठोके सर, प्रफुल्ल कुलकर्णी तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नांदुर्डीत श्री हरिभूषा बाबा यात्रोत्सवास दि. १९ पासून प्रारंभ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड तालुक्यातील नांदुर्डी येथील जागृत देवस्थान श्री हरिभूषा बाबा यात्रा उत्सव दि.१९/३/२०२६ ते दि२०/३/२०२६ या कालावधीत होणार असून या निमित्ताने समस्त ग्रामस्थांच्या सहकार्याने या वर्षी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे दि.१९ रोजी श्री हरिभूषा बाबांची विधिवत पूजा करून गावातून ढोल ताशांच्या गजरात सायंकाळी कावडीची मिरवणूक काढण्यात येणार असून दि.२० रोजी सकाळी ठीक ८ ते ११ हजेरीचा कार्यक्रम होणार आहे श्री शिव मल्हार जागरण पार्टी नाशिक रोड भाऊसाहेब जाधव व उषा जाधव पार्टी यांचा कार्यक्रम होणार आहे त्याच दिवशी सायंकाळी ४ते ७ कुस्त्यांचा तसेच, विविध कर्मुकीचे कार्यक्रम होणार आहेत याप्रसंगी श्री हरिभुषा बाबा यात्रा उत्सव कमिटी च्या वतीने यात्रा यशस्वी करण्यासाठी प्रयत्नशील असून या उत्सवाचा भावी भक्तांनी लाभ घ्यावा असे आव्हान यात्रा उत्सव कमिटीच्या वतीने करण्यात आले आहे.